“महामानवांच्या विचारांची मशाल घरोघरी पोहोचवा!”


(जयंती विशेष संपादकीय पान क्र-२)

साप्ताहिक
# प्रगत भारत
Web:www.pragatbharat.com,youtube-pragatbhart,Em-pragagatbhart@gmail.com,mo.9860877789

अप्रतिम विश्वासाच अलिशान दालन..
LAXMI JEWELLERS
सरकारमान्य सोने-चांदी दागिन्यांची खात्रीशीर जुनी पेढी
लक्ष्मी ज्वेलर्स

रुक्मिणी कॉम्पलेक्स,देहू-आळंदी रोड,टाळगाव चिखली,पुणे मो-९८९०१५४३५४

• वर्ष:१८ • अंक क्र. ३८ • साप्ताहिक • मंगळवार दि.१४ ते २० एप्रिल २०२६ • RNI/MAH/MRA/2008/25149 • RNP/पोस्ट- PCE/006/2024-2026 • पृष्ठे-४ • किंमत:२.००

## महिलांना लोकसभा आणि विधानसभेत आरक्षण देण्याचा निर्णय हे महात्मा फुले यांना खरे अभिवादन-मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**पुणे:**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी महिलांना लोकसभा व विधानसभेत ३३ टक्के आरक्षण देण्याचा निर्णय घेतला असून तो महात्मा ज्योतिराव फुले यांच्या स्त्री-शिक्षण व महिला सक्षमीकरणाच्या विचारांना अनुरूप असून त्यांना खरी आदरांजली असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.महात्मा ज्योतिराव फुले यांच्या द्विशताब्दी जयंती वर्षानिमित्त त्यांचे मुळगाव खानवडी (ता.पुरंदर)येथे पुणे जिल्हा परिषदेकडून उभारण्यात आलेल्या‘ज्योती-सावित्री जिल्हा परिषद शाळेचे’उदघाटन त्यांच्या हस्ते करण्यात आले.त्यावेळी ते बोलत होते.

कार्यक्रमाला अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ,ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे,उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, शिक्षण मंत्री दादाजी भुसे,कृषी मंत्री दत्तात्रय भरणे,अल्पसंख्याक मंत्री अतुल सावे,कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा,हिला व बालविकास मंत्री अदिती तटकरे, शिक्षण राज्यमंत्री योगेश कदम आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, महात्मा ज्योतिराव फुले यांच्या पैतृक गावात उभारलेली ही अत्याधुनिक शाळा म्हणजे द्विशताब्दी वर्षाची सर्वात योग्य सुरुवात आहे. सीबीएसई पॅटर्नवरील इयत्ता पहिली ते बारावीपर्यंतची ही राज्यातील पहिली जिल्हा परिषद शाळा असून आंतरराष्ट्रीय दर्जाचे शिक्षण उपलब्ध करून देण्यास हे महत्त्वपूर्ण पाऊल ठरणार आहे.

दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या पुढाकारातून या शाळेची उभारणी झाली असून त्यांनी शाळा उभारणीच्या प्रत्येक टप्प्यावर लक्ष घातल्याचेही मुख्यमंत्र्यांनी नमूद केले. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले. छत्रपती शिवाजी महाराजांची समाधी शोधून काढून पहिली शिवजयंती साजरी करण्याचे कार्यही महात्मा फुले यांनीच केले,महात्मा फुले यांच्या विचारांचा वारसा पुढे नेत राज्य शासन ‘महात्मा फुले जनआरोग्य योजना’ राबवत असून त्याअंतर्गत नागरिकांना ५ लाख रुपयांपर्यंत मोफत उपचार दिले जात आहेत.‘महाज्योती’च्या माध्यमातून ओबीसी विद्यार्थ्यांनी स्पर्धा परीक्षांमध्ये उल्लेखनीय यश मिळवले असल्याचे फडणवीस म्हणाले.


मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महात्मा ज्योतिराव फुले यांच्या १९९ व्या जयंती निमित्ताने महात्मा फुले स्मारकात जाऊन अभिवादन करताना

मंत्री छगन भुजबळ म्हणाले, महात्मा फुले यांच्या जन्मतिथीबाबत संशोधनातून ११ एप्रिल १८२७ ही तारीख निश्चित झाली आहे. सावित्रीबाई फुले यांनी १८९१ मध्ये प्रकाशित केलेल्या ‘महात्मा फुले यांचे अमर जीवन’ या ग्रंथात या तारखेचा उल्लेख असल्याचे त्यांनी सांगितले.महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांचे मुख्य कार्य बहुजन समाजाला शिक्षित करणे हेच होते. त्याच विचारातून खानवडी येथे उभारलेली ही आधुनिक सीबीएसई शाळा ही त्यांच्या कार्याची पुढची पायरी आहे. महात्मा फुले हे ‘नेशन बिल्डर’ होते तसेच अंधश्रद्धा आणि ब्राह्मण्यवादी प्रवृत्तींच्या विरोधात लढणारे विचारवंत होते. त्यांच्या कार्यात विविध समाजघटकांनी सहभाग घेतला होता. त्यांनी एका ब्राह्मण विधवेच्या मुलाला दत्तक घेऊन समतेचा आदर्श निर्माण केला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा महिलांना राजकीय आरक्षण देण्याचा निर्णय हा त्यांच्या विचारांना दिलेली खरी आदरांजली असल्याचे मंत्री भुजबळ म्हणाले.

ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांनी महात्मा फुले यांच्या जन्मगावातून द्विशताब्दी वर्षाच्या कार्यक्रमाची सुरुवात होत असल्याबद्दल आनंद व्यक्त केला.खानवडी येथे महात्मा फुले यांच्या मूळ घराची प्रतिकृती तसेच नायगाव येथे सावित्रीबाई फुले यांचे भव्य स्मारक उभारण्यासाठी शासन प्रयत्नशील असल्याचे त्यांनी सांगितले. सुमारे १० ते १२ कोटी रुपयांचा प्रकल्प कटगुण येथे तर नायगाव येथे सुमारे १५० कोटी रुपयांचे स्मारक उभारण्यात येणार असल्याची माहिती त्यांनी दिली.जिल्हा परिषदेचे अध्यक्ष वीरधवल जगदाळे यांनी या शाळेच्या माध्यमातून महात्मा फुले यांच्या विचारांचा प्रसार होणार असून ग्रामीण विद्यार्थ्यांना नवे दालन उपलब्ध होईल, असा विश्वास व्यक्त केला.कार्यक्रमाला खासदार सुप्रिया सुळे,आमदार योगेश टिळेकर, राहुल कुल, शंकर मांडेकर, बापूसाहेब पठारे,जिल्हा परिषदेचे अध्यक्ष वीरधवल जगदाळे ,उपाध्यक्ष विवेक वळसे पाटील, कौशल्य विकास विभागाचे आयुक्त अमित सैनी,विभागीय आयुक्त डॉ.चंद्रकांत पुलकुंडवार,मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील, तसेच जिल्हा परिषदेचे पदाधिकारी, सदस्य व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## शासनाने अगोदर अनुसूचित जातीची आरक्षण मर्यादा वाढवावी-इंजि.देगलूरकर

**नांदेड:महाराष्ट्रात अनुसूचित जातीला फक्त तेरा टक्के आरक्षण देण्यात येत आहे. हे अन्यायकारक आहे. यासाठी शासनाने अगोदर अनुसूचित जातीची आरक्षण मर्यादा वाढवावी अशी मागणी अखिल भारतीय गुरु रविदास समता परिषदेचे नेते इंजि. चंद्रप्रकाश देगलूरकर यांनी केली आहे.**

आरक्षण उपवर्गीकरणाच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना इमेलवर पाठविलेल्या निवेदनातून अखिल भारतीय गुरु रविदास समता परिषदेचे नेते इंजि. चंद्रप्रकाश देगलूरकर यांनी अनुसूचित जातीच्या आरक्षणाची मर्यादा सोळा ते अठरा टक्के पर्यंत वाढवण्याची मागणी केली.



महाराष्ट्रात जनगणना झाली तर अनुसूचित जातीची संख्या वीस टक्के पर्यंत जाऊ शकते.सध्या देशात पंधरा टक्के आरक्षण देण्यात येत असून महाराष्ट्रात तेरा टक्के आरक्षण कशाच्या आधारावर देण्यात येत आहे. आमदार खासदारांचे राजकीय आरक्षण देखील कापण्यात आले आहे.याबद्दल मागासवर्गीय पक्ष संघटना गुलाम मानसिकतेमुळे गप्प बसले असतील परंतु अखिल भारतीय गुरु रविदास समता परिषद आपल्या संवैधानिक हक्काचा वाटा घेतल्याशिवाय गप्प बसणार नाही असा इशारा या निवेदनाच्या माध्यमातून देण्यात आला आहे.

बौद्ध आणि मातंग यांच्या नंतर महाराष्ट्रात चर्मकार समाज मोठ्या संख्येने राहतो परंतु आरक्षण उपवर्गीकरणासाठी न्या.अनंत बदर समितीने चर्मकार समाजाला विश्वासात घेतले नाही किंवा मुलाखतीसाठी बोलावले नाही. आता ऐन फुले आंबेडकर जयंती महोत्सवाच्या धामधुमीत हरकती मागविल्या असून हे एक षडयंत्र असून त्याचा अखिल भारतीय गुरु रविदास समता परिषदेच्या वतीने जाहिर धिक्कार करण्यात येत असल्याचेही या निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

## सायबर सुरक्षित युवा पिढीने पुढाकार घ्यावा:डॉ.दीपक शहा

**चिंचवड:**येथील प्रतिभा वाणिज्य आणि संगणक अध्ययन महाविद्यालयाने सायबर सुरक्षा क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करत राष्ट्रीय स्तरावर आपला ठसा उमटवला आहे.क्विक हील फाउंडेशनच्या ‘‘सायबर शिक्षणासाठी सायबर सुरक्षा’’ या महत्त्वपूर्ण उपक्रमांतर्गत आयोजित करण्यात आलेल्या राष्ट्रीय कार्यक्रमात महाविद्यालयाच्या सायबर क्लबने उत्कृष्ट प्रदर्शन करत ‘‘सर्वोत्कृष्ट सर्वंकष (ओव्हर ऑल) सायबर क्लब’’या गटात द्वितीय उपविजेतेपद पटकावण्याचा बहुमान मिळवला.पुरस्कारांचे वितरण क्विक हील फाउंडेशनच्या अध्यक्षा अनुपमा काटकर आणि महाराष्ट्र सायबरचे उपमहानिरीक्षक संजय शिंत्रे यांच्या हस्ते पुणे येथे करण्यात आले.




या कार्यक्रमास प्रतिभा शैक्षणिक संकूलचे संस्थापक सचिव डॉ. दीपक शाह,प्राचार्या क्षितिजा गांधी,शिक्षक समन्वयिका डॉ.हर्षिता वाच्छानी,तसेच सायबर क्लबचे सर्व पदाधिकारी उपस्थित होते. महाविद्यालयाच्या वतीने आयोजित कौतूक सोहळ्यात संस्थापक,सचिव डॉ.दीपक शहा म्हणाले या यशामुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास अधिक दुणावला असून,भविष्यात सायबर सुरक्षा क्षेत्रात आणखी मोठे यो-गदान देण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला.महाविद्यालयाच्या या यशस्वी वाटचालीमुळे इतर विद्यार्थ्यांनाही प्रेरणा मिळत असून, सायबर सुरक्षित भारत घडविण्यासाठी युवा पिढी सज्ज असल्याचे चित्र यातून स्पष्ट होत आहे. यावेळी संस्थेच्या खजिनदार डॉ.भूपाली शहा,संचालिका डॉ. तेजल शहा,मुख्य प्रशासकीय अधिकारी डॉ.राजेंद्र कांकरीया आदीनी शुभेच्छा दिल्या.यावेळीप्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते.

## चिखली येथील श्री भैरवनाथ महाराज उत्सव समितीच्या विशेष माहिती बद्दल सा.प्रगत भारत वृत्तपत्रकास शुभेच्छा

**टाळगाव चिखली:**देहू-आळंदी या तीर्थक्षेत्राच्या मध्यभागी अस-लेले व इंद्रायणी नदीच्या काठावरती ऐतिहासिक ओळख असलेले टाळगाव चिखली गावाचे ग्रामदैवत श्री भैरवनाथ महाराज उत्सव व श्री हनुमान जन्मोत्सव सोहळा निमित्त विविध सांसकृतीक व बैलगाडी शैर्यत कुस्ती आखाडा अशा विविध कार्यक्रमाचे श्री भैरवनाथ उत्सव समितीच्या वतीने आयोजन करून साजरा करण्यात आला.

श्री.भैरवनाथ महाराज उत्सव यांची



माहिती नागरिकांपर्यत साप्ताहिक प्रगत भारत वृत्तपत्र यामधून यात्रा उत्सवाची माहिती देण्यात आली होती.या अंकाचे संपादक दत्तात्रय कांबळे यांनी वाटप केले.यावेळी समस्त टाळगाव चिखलीचे ग्रामस्थ व भैरवनाथ महाराज उत्सव समितीचे अध्यक्ष अँड.प्रकाश मोरे व पदाधिकारी तसेच टाळगाव चिखलीचे ग्रामस्थ माजी पोलीस पाटील उपस्थित राहून वृत्तपत्रकास शुभेच्छा दिल्या.

## बार्टी संस्थेत क्रांतीसुर्य महात्मा जोतीराव फुले यांना अभिवादन

**पुणे:**-दि ११ एप्रिल डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) पुणे संचलित शासकीय सफाई कामगारांच्या मुला मुलांची निवासी शाळा,येरवडा,पुणे येथे क्रांतीसुर्य महात्मा जोतीराव फुले व भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या संयुक्त जयंती निमित्त त्यांच्या प्रतिमेस बार्टी संस्थेच्या निबंधक डॉ.सुचिता शिंदे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी विभागप्रमुख शुभांगी पाटिल, रविंद्र कदम,डॉ.बबन जोगदंड,यांनीही अभिवादन केले.सामाजिक समता सप्ताह अंतर्गत एकपात्री नाटक मी सत्यशोधक महात्मा जोतीराव फुले



बोलतोय सादरकर्ते कुमार आहेर यांनी जोतीराव फुले व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनातील अनेक पैलूंवर प्रकाश टाकून त्यांनी मानवतेच्या कल्याणासाठी केलेल्या कार्याचा गौरव केला. विद्यार्थ्यांनी उच्च शिक्षणाची कास धरून सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग आणि बार्टीच्या विविध योजनांचा लाभ घ्यावा असे आवाहन केले. एकपात्री नाटकाला विद्यार्थ्यांनी मोठा प्रचंड प्रतिसाद देऊन त्यांचे स्वागत केले.यावेळी लेखाधिकारी नितिन चव्हाण,कार्यालय अधिक्षक प्रज्ञा मोहिते,मुख्याध्यापक श्रीमती चेंडगे,यांच्यासह बार्टी संस्थेतील अधिकारी व कर्मचारी तसेच शिक्षक विद्यार्थी उपस्थित होते.

## डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे आंतरराष्ट्रीय विचार आजही दिशादर्शक


**पिंपरी:**-भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या आंतरराष्ट्रीय संबंधांवरील विचारांची आधुनिक काळातही मोठी उपयुक्तता असल्याचे मत ‘विचार प्रबोधन पर्व २०२६’ अंतर्गत आयोजित परिसंवादात तज्ज्ञांनी व्यक्त केले.

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेतर्फे महात्मा फुले यांच्या द्विशताब्दी जयंती वर्षानिमित्त व डॉ.आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. परिसंवादात देश-विदेशातील तज्ज्ञांनी ऑनलाइन व प्रत्यक्ष सहभाग घेत जागतिकीकरणाच्या युगात शिक्षण व रोजगाराच्या संधींबाबत मार्गदर्शन केले.

नंदू मोरे,रेवा रॉय,धम्मचारी सुदिप्त,विरेंद्र घुटके यांसह विविध मान्यवरांनी कौशल्यविकास,तांत्रिक ज्ञान, संवादकौशल्य आणि स्थानिक भाषा यांचे महत्त्व अधोरेखित केले. कृत्रिम बुद्धिमत्ता,डेटा सायन्स, ॲनिमेशन यांसारख्या क्षेत्रांत मोठ्या संधी उपलब्ध असल्याचे त्यांनी सांगितले.

**(पान क्रमांक ३ वर क्रमशा बातमी)**

सुवर्णसंधी सभासद अभियान
वाढदिवस तुमचा, शुभेच्छा आमच्या...
सा.प्रगत भारत
वृत्तपत्रकाचेआजच सभासद व्हा..मो.नं.९८६०८७७७८९


मातोश्री ट्रेडर्स होलसेल
निवडक किराणा मालाचे,सुका मेवा(ड्रायफ्रूट)
डाळी,कडधान्य,गहु,ज्वारी,बाजरी व तांदुळ मालाचे होलसेल व्यापारी.
पत्ता-खंडेश्वर निवास,पाटीलनगर,देहू-आळंदी मेनरोड,भाजी मंडई शेजारी,टाळगाव चिखली पुणे-६२ मो-९०९६८५२८०७,८०८७६५१८४०


पिं.चिं.ॲडव्होकेटस असोसिएशन
(दिवाणी फौजदारी न्यायालय नेहरूनगर पिंपरी-१८)
यांच्या वतीने..
भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त
हार्दिक शुभेच्छा..!
शुभेच्छुक


ॐ कारं बिंन्दू संयुक्त नित्यं धायन्ति योगिना:।।कामद मोक्षदं चैव ॐ काराय नमो नम :।।

## संपादकीय


### ‘‘महामानवांच्या विचारांची मशाल घरोघरी पोहोचवा!‘‘

महात्मा ज्योतिबा फुले,डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि बाबू जगजीवन राम या तिन्ही नेत्यांनी विषमतेच्या अंधाराविरुद्ध लढा दिला.ज्योतिबांनी शेतकरी आणि स्त्रियांच्या शिक्षणासाठी आवाज उठवला,डॉ.बाबासाहेबांनी त्याला संविधानाचे कायदेशीर रूप दिले,तर बाबू जगजीवन राम यांनी देशाचे पहिले कामगार मंत्री आणि उपपंतप्रधान म्हणून त्या अधिकारांचे संरक्षण केले.आजच्या पिढीने या तिन्ही महापुरुषांना एकाच चौकटीत पाहून त्यांच्यातील वैचारिक साखळी समजून घेतली पाहिजे.फुले(जन्म:११ एप्रिल १८२७ मृत्यू-२८ नोव्हेंबर १८९० जन्मस्थळ-पुणे) डॉ.बाबासाहेब आंबेडकर (जयंती:१४ एप्रिल १८९१ मृत्यू-६ डिसेंबर १९५६ जन्मस्थळ-महु मध्यप्रदेश)बाबू जगजीवन राम (जन्म:५ एप्रिल १९०८ मृत्यू-६ जुलै १९८६ जन्मस्थळ-चांदवा बिहार)या तिन्ही महामानवांच्या विचारांना मानाचा त्यांच्या जयंती निमित्त सा.प्रगत भारत वृत्तपत्र संपादक दतात्रय कांबळे यांचा मानाचा मुजरा.

महा जोतीराव फुले यांचा जन्म ११ एप्रिल १८२७ रोजी महाराष्ट्रातील शूद्र वर्णातील माळी जातीमध्ये झाला.माळी जातीमुळे फुले हा शब्द त्यांच्या नावावर आला आहे.त्यांच्या वडिलांचे नाव गोविंदराव आणि आईचे नाव चिमणाबाई होते. फुले एक वर्षाची असताना त्यांची आई चिमणाबाई यांचे निधन झाले. तेव्हा गोविंदराव यांची बहीण जोतीबा फुले यांची आत्या सगुनाबाई यांनी त्यांना मोठे केले.सगुणाबाईंनी ही आधुनिक विचारांच्या होत्या त्यांनी तेच संस्कार जोतिराव फुले यांच्यावर केले.व त्यांच्या मध्ये समाजाच्या प्रगती साठी प्रेरणा दिली.

डाॅ.बाबासाहेब आंबेडकरांचा यांनी देशाची घटना लिहिली व तळागाळातील समाजाला समता बंधुता असा न्याय हक्क व अधिकार मिळवून दिला अशा महामानवाच्या प्राथमिक अवस्थे मधील माहिती देत आहोत यांचा जन्म१४ एप्रिल १८९१ रोजी महू (आताचे डॉ.आंबेडकर नगर) मध्यप्रदेश या लष्करी छावणी असलेल्या गावी रामजी व भीमाबाईंच्या पोटी झाला.रामजींनी मराठी व इंग्रजी भाषेचे यथाविधी शिक्षणही घेतले होते. भीमराव हे रामजी सकपाळ व आई भीमाबाई यांचे १४ वे व अंतिम अपत्य होते. बाळाचे नाव भिवा असे ठेवण्यात आले,त्यांची भीम,भीमा व भीमराव ही नावेही प्रचलित झाली. आंबेडकरांचे कुटुंब हे त्याकाळी अस्पृश्य गणल्या गेलेल्या महार जातीचे आणि महाराष्ट्रातील रत्नागिरी जिल्ह्याच्या मंडणगड तालुक्यातील आंबडवे या गावचे होते.१७ इ.स. १८९४ मध्ये सुभेदार रामजी सकपाळ इंग्रजी सैन्यातील मुख्याध्यापक पदाच्या नोकरीवरून निवृत्त झाले आणि महाराष्ट्रातल्या रत्नागिरी जिल्ह्यातील आपल्या मूळ गावाजवळील दापोली या गावातील कॅम्प दापोली वस्तीत परिवारासह राहू लागले.भीमराव वयाने लहान असल्यामुळे कॅम्प दापोली येथील शाळेत त्यास प्रवेश मिळाला नाही व भीमरावास घरीच अक्षर ओळख करून द्यावी लागली. इ.स. १८९६ मध्ये रामजींनी आपल्या कुटुंबासह दापोली सोडले व ते साताऱ्याला जाऊन तेथे राहिले. यावेळी भीमरावाचे वय पाच वर्षाचे झाले होते.रामजींनी इ.स.१८९६ च्या नोव्हेंबर महिन्यात सातारा येथील कॅम्प स्कूल या मराठी शाळेमध्ये भीमरावाचे नाव दाखल केले.१३ या वर्षीच त्यांनी कबीर पंथाची दीक्षा घेतली. साताऱ्यात आल्यावर त्यावेळी भीमरावाचे वय पाच वर्षाचे झाले होते. हे वय त्यास शाळेत प्रवेश देण्यास योग्य होते.रामजींनी इ.स.१८९६ च्या नोव्हेंबर महिन्यात सातारा येथील कॅम्प स्कूलमध्ये भीमरावाचे नाव दाखल केले.साताऱ्यातील कॅम्प स्कूलमधील मराठी शिक्षण पूर्ण केल्यानंतर साताऱ्यातीलच सातारा हायस्कूल या इंग्रजी सरकारी हायस्कूलमध्ये भीमरावाचे नाव दाखल केले.कोकणासह महाराष्ट्रातील लोक पूर्वी आपले आडनाव आपल्या गावाच्या नावावरून ठेवत असत व त्यात शेवटी कर शब्द जोडण्याचा प्रघात आहे.त्यामुळेच बाबासाहेबांचे आडनाव ‘‘सकपाळ‘‘असतांना त्यांचे वडील रामजी यांनी ७ नोव्हेंबर १९०० रोजी साताऱ्यातील गव्हर्नमेंट हायस्कूल (आताचे प्रतापसिंह हायस्कूल)मध्ये ‘‘आंबडवेकर‘‘असे आडनाव नोंदवले.साताऱ्याच्या या शाळेत भीमरावांना शिकवण्यासाठी कृष्णा केशव आंबेडकर नावाचे शिक्षक होते.शाळेच्या दप्तरात नोंदवलेले भीमरावांचे आंबडवेकर हे आडनाव उच्चारताना त्यांना ते आडनिडे वाटत असे म्हणून माझे आंबेडकर हे नाव तू धारण कर,त्यांनी असे भीमरावांना सुचविले. त्यावर भीमरावांनी होकार दिल्यावर तशी नोंद शाळेत झाली.तेव्हा पासून त्यांचे आडनाव आंबडवेकरचे आंबेडकर झाले.२० नोव्हेंबर १९०४ मध्ये भीमरावांनी इंग्रजी चौथीची परीक्षा उत्तीर्ण केली.

बाबू जगजीवन राम यांचा जन्म बिहारमधील एका चर्मकार (दलित) कुटुंबामध्ये झाला.जन्म:५ एप्रिल १९०८ बिहारमधील चंदवा (भोजपूर जिल्हा).त्यांच्या समाजकार्य माहिती घेता त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य दलितांच्या उत्थानासाठी आणि अस्पृश्यता निवारणासाठी व्यतीत केले.१९३७ मध्ये त्यांनी अखिल भारतीय दलित वर्ग संघची स्थापना केली.त्यांनी संत गुरू रविदास महासभा संघ यांची स्थापना केली देशाची घटना संविधान बनविण्यासाठी व त्यामधून दलितांना समान आरक्षण व हक्क मिळविण्यासाठी डाॅ.बाबासाहेब आंबेडकर यांना देशाची घटना लिहिण्यासाठी त्यांना प्रोत्साहित करूण त्यांच्या सोबत राहून यशस्वी प्रयत्न केला.त्यांच्या राजकीय प्रवासाची माहिती घेता(१९३६ ते १९८६) सलग ५० वर्षे संसदेत व विधीमंडळातराहण्याचा विक्रम ते १९५२ ते१९८६ पर्यत सलग ८ वेळा लोकसभेवर निवडून आले होते तसेचते भारताचे पहिले कामगार मंत्री,भारताचे उपपंतप्रधान म्हणूनही कार्य केले. डाॅ.बाबासाहेब आंबेडकर यांनी भारत देशाची घटना संविधान लिहिले व त्या घटनेची व त्यामधील हक्काची ताकत उभी करण्याचे देशभर काम बाबू जगजीवन राम यांनी केले.६ डिसेंबर १९५६ रोजी डाॅ.बाबासाहेब आंबेडकर यांचे निधन दिल्ली येथे निधन झाले त्यावेळी बाबु जगजीवन राम हे नागरी उड्डान मंत्री होते त्यांनी दिकोटा विमानतळापासून विमानाने डाॅ.बाबासाहेब आंबेडकर यांचे पार्थिव शरीर व त्यांच्या कुटूंबाला दिल्ली मधून मुंबई मध्ये पाठविण्याची व्यवस्था पार पाडली.




## सतत थकवा आणि चक्कर येतेय? असू शकते लोहाची कमतरता;जाणून घ्या काय खावे

**पुणे:**बिघडलेली जीवनशैली आणि आहारातील बदलांमुळे सध्या अनेकांमध्ये रक्ताल्पता म्हणजेच रक्तातील लोहाची कमतरता जाणवत आहे. थकवा येणे, चक्कर येणे आणि त्वचा निस्तेज होणे ही याची प्राथमिक लक्षणे आहेत. जर तुमच्या शरीरात लोहाची कमतरता असेल, तर औषधांसोबतच आहारात काही नैसर्गिक गोष्टींचा समावेश करणे अत्यंत आवश्यक आहे.लोहाची कमतरता भरून काढण्यासाठी खालील पदार्थांचे सेवन फायदेशीर ठरते..

**पालेभाज्या (विशेषत: पालक)**
पालक हा लोहाचा सर्वात मोठा स्रोत मानला जातो. पालकामध्ये केवळ लोहच नाही, तर व्हिटॅमिन सी देखील असते, जे शरीराला लोह शोषून घेण्यास मदत करते. मेथी आणि कोथिंबीर यांचाही आहारात समावेश करा.

ड्राय फ्रूट्स आणि बिया
**खजूर आणि मनुके:** रोज सकाळी भिजवलेले २-३ खजूर आणि काळे मनुके खाल्ल्याने रक्तातील हिमोग्लोबिन झपाट्याने वाढते.

**भोपळ्याच्या बिया:** यामध्ये लोहाचे प्रमाण भरपूर असते,जे स्नॅक्स म्हणून उत्तम पर्याय आहेत.

**कडधान्ये**-डाळी,चणे,राजमा आणि सोयाबीनमध्ये लोहाचे प्रमाण अधिक असते. शाकाहारी लोकांसाठी लोह मिळवण्याचा हा सर्वात सोपा मार्ग आहे.

**फळ डाळिंब:**डाळिंब खाल्ल्याने शरीरातील रक्ताची कमतरता दूर होते.पेरू आणि सफरचंद: ही फळे लोहाचे चांगले स्त्रोत आहेत.

**बीट:**बीटचा रस किंवा कोशिंबीर रक्तातील हिमोग्लोबिन वाढवण्यासाठी रामबाण उपाय मानला जातो.गुळामध्ये नैसर्गिक लोह असते. जेवणानंतर थोडा गूळ खाणे किंवा गूळ-शेंगदाण्याचे लाडू खाणे हा लोहाची कमतरता भरून काढण्याचा पारंपारिक आणि प्रभावी मार्ग आहे.

केवळ लोहयुक्त पदार्थ खाऊन चालत नाही, तर ते शरीरात शोषले जाणेही महत्त्वाचे असते. त्यासाठी आहारात लिंबू, संत्री किंवा आवळा यांसारख्या व्हिटॅमिन सी युक्त पदार्थांचा समावेश करा.यामुळे अन्नातील लोह शरीरात लवकर शोषले जाते.**(संग्रहित माहिती)**




प्रगत भारत हे साप्ताहिक वृत्तपत्रक मालक, मुद्रक व प्रकाशक संपादक दत्तात्रय तानाजी कांबळे. यांनी त्रिमुर्ती मुद्रिका,५४/२६ एम.आय.डी.सी.चिंचवड पुणे-१९ येथे छापून रजि.मुख्य कार्यालय ऑ.नं.२४,साईकृपा भवन, पहिला मजला, पुणे-मुंबई रोड, खराळवाडी, पिंपरी, पुणे-१८ येथून प्रकाशित केले.संपर्क मो. ९८६०८७७७८९, Web:www.pragatbharat.com सदर अंकात प्रसिध्द झालेल्या वृत्तांशी किंवा लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही सर्व कायदेशिर बाबी पिंपरी न्यायालयाअधिन.(पी.आर.बी.कायद्यानुसार जबाबदारी)● RNI No. MAH/MAR/2008/25149 ● Dec. No. PHM/SR/136/VIII/2008 Published on Tuesday and Posted on Thursday POSTED AT PIMPRI P.F. POST OFFICE LICENCE NO. Reg. No. PCE/006/2024-2026'pragat Bharat' Weekly News paper is owned,printer & Published by Dattatraya Tanaji Kamble,Printed at shree Trimurti Mudrika 54/26,D-2 lockMIDC,Chinchwad,Pune-411018 ● Editor:Dattatraya kamble Email - pragatbharat@gmail.com, Web:www.pragatbharat.com ●RNI No. MAH/MAR/2008/25149 ● legal disputes under pimpri court jurdion



## महापालिकेतील चुकीच्या कामांवर अंकूश हीच भाजपाची कार्यप्रणाली! शहराध्यक्षा शत्रुघ्न काटे यांची भूमिका

**पिंपरी-चिंचवड महापालिकेतील तब्बल ५२ कोटी रुपयांची बिले लेखा विभागातील अधिकाऱ्यांनी चुकीच्या पद्धतीने अदा केली. यामध्ये ठकेदार किंवा नगरसेवक यांचा दोष नाही, तर संबंधित अधिकाऱ्यांने अधिकारांचा गैरवापर केला आहे. त्यावर भाजपाच्या महापालिकेतील पदाधिकाऱ्यांनी आक्रमक भूमिका घेत पर्दाफाश केला. पिंपरी-चिंचवडकरांनी विश्वासाने सलग दुसऱ्यांदा भारतीय जनता पार्टीला सत्ता स्थापनेची संधी दिली. त्यामुळे शहरवासीयांच्या विश्वासाला आम्ही कदापि तडा जावू देणार नाही. ‘‘चुकीच्या कामांना अंकूश हीच भाजपाची कार्यप्रणाली आहे’’ अशी भूमिका भाजपा शहराध्यक्ष तथा नगरसेवक शत्रुघ्न काटे यांनी मांडली आहे.**



पिंपरी-चिंचवड महापालिकेमधील तब्बल ५२ कोटी रुपयांच्या आर्थिक प्रकरणामुळे मोठी खळबळ उडाली. स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे यांनी यावर प्रकाश टाकला आणि कारवाईची मागणी केली.मुख्य लेखा व वित्त अधिकारी प्रवीण जैन यांनी याबाबत प्रसारमाध्यमांना माहिती देवून दिशाभूल करण्याचा प्रयत्न केला.मात्र,महापालिका विधी व कायदा विभागाने सदरबाबत लेखी अभिप्राय नोंदवला आहे.‘‘लेखा विभागाकडून अदायगी केलेली बिलांना स्थायी समिती आणि मुख्य सभेची मान्यता घेणे बंधनकारक आहे.’’ असा अभिप्राय आला. त्यामुळे जैन यांच्या चुकीच्या कामांचा पर्दाफाश झाला. दरम्यान,राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेनेच्या नगरसेवकांनी पत्रकार परिषद घेतली आणि ५२ कोटी रुपयांच्या बिलांबाबत चुकीच्या उपसूचनांवर केवळ भाजपाच्या नगरसेवकांच्या स्वाक्षरी आहेत. त्यामध्ये आमच्या नगरसेवकांचा संबंध नाही,अशी भूमिका मांडली. त्याद्वारे या प्रकरणाला राजकीय वळण देण्याचा प्रयत्न केला जात आहे. वास्तविक, काही बिलांच्या उपसूचनांवर राष्ट्रवादीच्या नगरसेवकांच्याही सूचक- अनुमोदक म्हणून स्वाक्षरी आहेत. मग,त्याची जबाबदारी संबंधित नगरसेवकांची आहे, अशी भूमिका मांडणे उचित नाही. त्यामुळे या प्रकरणात राजकीय उद्देशाने वातावरण निर्मिती करु नये,असे आवाहनही शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे यांनी केले आहे.

**महापालिकेतील विविध ठेकेदारांनी ५२ कोटी रुपयांची बिलांसंदर्भात उपसूचनांवर नगरसेवकांच्या स्वाक्षरी घेवून नियमबाह्यपणे बिल अदायगी केल्याप्रकरणी महापालिकेचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी प्रवीण जैन यांना सक्तीच्या रजेवर पाठवले आहे. विधी व कायदा विभागानेही अभिप्राय नोंदवला आहे. महापालिकेत सत्ता स्थापन केल्यानंतर भाजपाने अर्थसंकल्पामध्ये असलेल्या त्रूटी दूर करण्याची भूमिका घेतली. त्यानंतर आता लेखा विभागाच्या चुकीच्या कामाला प्रतिबंध करण्यात आला. पिंपरी-चिंचवडकरांनी दिलेली जबाबदारी सक्षमपणे आणि पारदर्शी कारभार या भावनेतून आम्ही पार पाडत आहोत.-शत्रुघ्न काटे, हराध्यक्ष तथा नगरसेवक,**

## आम आदमी पार्टी महाराष्ट्र युवक आघाडीच्या प्रदेशाध्यक्षपदी रविराज काळे यांची नियुक्ती

**मुंबई:**आम आदमी पार्टीने महाराष्ट्र राज्यातील संघटन रविराज काळे यांची आम आदमी पार्टी महाराष्ट्र युवक आघाडीच्या प्रदेशाध्यक्षपदी अधिकृत निवड करण्यात आली आहे.



रविराज काळे यांची पक्षाप्रती असलेली निष्ठा,जनसंपर्क आणि युवकांमध्ये असलेली त्यांची पकड लक्षात घेऊन ही जबाबदारी त्यांच्यावर सोपवण्यात आली आहे.आगामी काळात राज्यातील सुशिक्षित बेरोजगार,विद्यार्थ्यांचे प्रश्न आणि युवक धोरणाबाबत पक्षाची भूमिका तळागाळातील तरुणांपर्यंत पोहोचवण्याचे मोठे आव्हान त्यांच्यासमोर असणार आहे. निवडीनंतर प्रतिक्रिया देताना रविराज काळे म्हणाले की:पक्षाने माझ्यावर जो विश्वास दाखवला आहे, त्याबद्दल मी अरविंद केजरीवाल आणि पक्षाच्या वरिष्ठ नेतृत्वाचे आभार मानतो.सोशल मीडियाच्या माध्यमातूनही युवकांकडून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.आम आदमी पार्टी महाराष्ट्र राज्य

## डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे आंतरराष्ट्रीय विचार आजही दिशादर्शक



(पान क्रमांक १ वरून )

प्रा.डॉ.संजय खोब्रागडे,प्रा. केशव वाघमारे आदी तज्ज्ञांनी आंबेडकरांच्या विचारांमधील समता, न्याय आणि जागतिक दृष्टीकोन यांचा आजच्या परराष्ट्र धोरणावर प्रभाव असल्याचे नमूद केले. विद्यार्थ्यांनी जागतिक स्तरावर स्पर्धात्मक होण्यासाठी व्यापक दृष्टी स्वीकारावी,असे आवाहनही करण्यात आले. दरम्यान, सायंकाळी गझलनवाज भीमराव पांचाळे यांच्या गझलांनी कार्यक्रमाला रंगत आणली. तसेच विविध सांस्कृतिक कार्यक्रमांतून आंबेडकरांच्या विचारांना अभिवादन करण्यात आले. आवेळी बहुसंख्येन नागरिक उपस्थित होते.

सा.प्रगत भारत
वृत्तपत्रकाचे आजच सभासद व्हा व घरपोच अंक मिळवा
वार्षिक ५००/-रू दुवार्षिक १000/- रूपये अधिक माहिती व जाहिरातीसाठी
संपर्क-९८६०८७७७८९

## नागरिकांसाठी एसआयआर (SIR)कॅम्पचे आयोजन मोशी येथे;मतदार नोंदणी मोहिमेला वेग


**मोशी:**पिंपरी चिंचवड शहरामधील भोसरी विधानसभा मतदारसंघातील नागरिकांसाठी महाराष्ट्र शासनातर्फे SIR (Special Information Registration) प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.ही प्रक्रिया सुलभ व्हावी यासाठी आपले नाव २००२ च्या मतदार यादीशी जोडणे आवश्यक आहे.विशेषताःज्यांचे वय ४० वर्षां पेक्षा जास्त आहे आणि ज्यांचे नाव २००२ च्या मतदार यादीत होते,त्यांनी बीएलओ (BLO) यांच्याकडे संपर्क करून ही नोंदणी लवकरात लवकर पूर्ण करावी

असे आवाहन करण्यात आले आहे. यासाठी रिव्हर रेसिडेन्सी फेज ३ क्लब हाऊसमध्ये सर्व रहिवाशांसाठी एसआयआर (SIR) कॅम्पचे आयोजन शुक्रवार दिनांक ३ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ११ ते दुपारी २.०० पर्यत करण्यात आले होते.



यावेळी बीएलओ (BL0) राणी कांबळे, सुनिता पवार,विश्वलता मोरे,मनीषा धुमाळ,अफजल सैय्यद,रोहिदास भांगले,अमोल गजे,अमोल गायकवाड,सागर वडवले,रेखा थोपटे,वर्षाराणी भागवत,कल्पना ढोरे व नोडल अधिकारी जयश्री शिंगाडे,सुनंदा नाडेकर मॅपिंग करून घेण्यासाठी सोसायटीत उपस्थित होते.

सदरच्या कॅम्पला भेट देण्यासाठी नायब तहसिलदार विकी परदेशी तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या फ क्षेत्रीय अधिकारी अतुल पाटील व साप्ताहिक प्रगत भारत वृत्तपत्र संपादक दत्तात्रय कांबळे उपस्थित होते.सदर कॅम्पसाठी रिव्हर रेसिडेन्सी फेज ३ फेडरेशन टीमचे अध्यक्ष नीलेश खांडेकर,रियाज मुल्ला,बाबूलाल्लाह भाई,सोसायटी मॅनेजर हरीश पाटोळे,व सोनावणे काकांसह सुरक्षा टीमचे सहकार्य लाभले.सदरच्या कॅम्पमुळे येथील रहिवाशांना त्यांचे मॅपींग पूर्ण करता आली. तसेच मॅपींग करण्यासाठी आवश्यक मार्गदर्शन मिळाले,ज्यामुळे त्यांना भविष्यात मदत होईल.



# आजचा दिवस हा ज्ञान, समानता आणि सामाजिक क्रांतीचा उत्सव-राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष योगेश बहल



**पिंपरी:**क्रांतिसूर्य महात्मा जोतिराव फुले यांच्या जयंतीनिमित्त खराळवाडी,पिंपरी येथील राष्ट्रवादी काँग्रेस मध्यवर्ती पक्ष कार्यालयातील फुले यांच्या प्रतिमेस तसेच पिंपरी येथील महात्मा फुले स्मारक येथे शहराध्यक्ष योगेश बहल यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी असे शहराध्यक्ष योगेश बहल बोलत होते की,'कोणताही धर्म ईश्वराने निर्माण केलेला नाही आणि चातुर्वण्य व जातिभेद ही निर्मिती मानवाचीच आहे' असे रोखठोकपणे बोलताना मात्र या विश्वाची निर्मिती करणारी कोणती तरी शक्ती आहे अशी त्यांची विचारसरणी होती. मानवाने गुण्यागोविंदाने रहावे असे त्यांचे मत होते. 'नीती हाच मानवी जीवनाचा आधार आहे' हा विचार मांडणारे जोतिराव एक तत्त्वचिंतक व्यक्तिमत्त्व होते.

भारतीय समाजातील महान समाजसुधारक,स्त्री शिक्षणाचे जनक आणि सत्यशोधक समाजाचे संस्थापक महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती म्हणून आजचा दिवस हा ज्ञान, समानता आणि सामाजिक क्रांतीचा उत्सव आहे.याप्रसंगी ॲड.गोरक्ष लोखंडे, यांनी देखील आपले मनोगत व्यक्त केले, १८४८ मध्ये पुण्यात मुलींसाठी पहिली शाळा सुरू करून शिक्षणाचा पाया रचला. जातिव्यवस्था,अस्पृश्यता आणि अंधश्रद्धेविरुद्ध त्यांनी आयुष्यभर लढा दिला, त्यांचे कार्य खूप मोठं आहे, अशा या थोर क्रांतीसूर्याला मी विनम्र अभिवादन करतो.यावेळी शहराध्यक्ष योगेश बहल, कार्याध्यक्ष फजल शेख, विजय लोखंडे, माजी नगरसेवक ॲड.गोरक्ष लोखंडे, नगरसेविका वर्षा जगताप,माजी नगरसेवक सतीश दरेकर,ओबीसी प्रदेश कार्याध्यक्ष सचिन औटे, सामाजिक न्याय विभागाचे अध्यक्ष संजय औसरमल,महिला वरिष्ठ कार्याध्यक्ष कविता खराडे,शहर उपाध्यक्ष अकबर मुल्ला, शकूल्ला पठाण, दत्तात्रय जगताप, अभिजीत आल्हाट,दिलीप पानसरे,उद्योग व्यापार अध्यक्ष श्रीकांत कदम, झोपडपट्टी सेल अध्यक्ष रविंद्र ओव्हाळ, वाहतूक सेल अध्यक्ष विनोद वरखडे,पदवीधर सेल अध्यक्ष प्रदीप आवटी, सरचिटणीस राजेंद्र पवार, पिंपरी विधानसभा कार्याध्यक्ष राजेंद्र कदम,युवक शहर संघटक स्वराज शिंदे,सरचिटणीस राजू चांदणे, गणेश गायकवाड, कुमार कांबळे, सचिन शिंदे, धनाजी तांबे, सुनिल अडागळे आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

**कामासाठी हशार व अनुभवी**
वय १८ वर्षापुढील मुली-मुले पाहिजे.
शैक्षणिक पात्रता-कॉम्प्युटर मधील **MS-CIT**- कोर्से,
**DIGITAL-MARKATING**
संपर्क-सा.प्रगत भारत वृत्तपत्र व ऑफिस नंबर २४ साई कृपा भवन मुंबई-पुणे रोड खराळवाडी पिंपरी पुणे-४११०१८
संपर्क -९८६०८७७७८९




# कर्करोग उपचार क्षेत्रात बीव्हीजी लाइफ सायन्सेसचे आशादायी संशोधन:'संयुग ७'ची प्रभावी कामगिरी डॉ.श्रीकांत माने

**पुणे:कर्करोगावर अधिक परिणामकारक आणि कमी दुष्परिणाम असलेले उपचार विकसित करण्याच्यादिशेने बीव्हीजी लाइफ सायन्सेस लिमिटेडने महत्त्वपूर्ण पाऊल उचलले असून 'संयुग ७' या नव्या फायटो-औषध आधारित संयुगाने कर्करोगाविरुद्धच्या लढ्यात आशादायी परिणाम दर्शवले आहेत.जनुकशास्त्र आणि अचूक उपचारपद्धती क्षेत्रातील आंतरराष्ट्रीय कीर्तीचे तज्ज्ञ,येल विद्यापीठ (अमेरिका) येथील प्राध्यापक डॉ. श्रीकांत माने यांनी या संयुगाच्या कार्यक्षमतेबाबत माहिती दिली.**

ते यशदा,पुणे येथे आयोजित कर्करोग विषयक विशेष शास्त्रीय कार्यक्रमात प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते.हा कार्यक्रम बीव्हीजी लाइफ सायन्सेस लिमिटेड आणि श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आला होता.या कार्यक्रमास बीव्हीजी समूहाचे संस्थापक हणमंतराव गायकवाड,ट्रस्टचे अध्यक्ष सुनील रासने,बीव्हीजी लाइफ सायन्सेसच्या संचालिका डॉ.जयश्री द्रविड यांच्यासह प्रख्यात गॅस्ट्रोएन्टेरोलॉजिस्ट डॉ. विनय थोरात,युरोलॉजिस्ट डॉ.





सुरेश पाटणकर आणि विविध वैद्यकीय महाविद्यालयांचे विभागप्रमुख उपस्थित होते.

डॉ.प्रतापराव गोळे हे खास साताऱ्यावरून या कार्यक्रमासाठी उपस्थित राहिले. एकूण २५० डॉक्टरांनी या कार्यक्रमात सहभाग नोंदवला.डॉ.माने यांनी सांगितले की,'संयुग ७' कर्करोग पेशींची वाढ रोखते,त्यांच्या हालचालींवर नियंत्रण ठेवते आणि त्यांचा शरीरातील इतर भागांमध्ये प्रसार (मेटास्टेसिस) होण्यास प्रतिबंध करते.तसेच, हे संयुग शरीराच्या रोगप्रतिकारक शक्तीला बळकटी देत कर्करोगविरोधी लढा अधिक प्रभावी बनवते.प्राथमिक निष्कर्षांनुसार,हे संयुग कर्करोग पेशींवर प्रभावीपणे परिणाम करते, तर सामान्य पेशींवर त्याचा अत्यल्प किंवा नगण्य परिणाम आढळतो.या संशोधनातून 'संयुग ७' कर्करोगाच्या वाढीशी संबंधित विविध जैविक प्रक्रियांवर प्रभाव टाकत असल्याचेही स्पष्ट झाले आहे.त्यामुळे सुरक्षित, लक्ष्यित आणि अधिक प्रभावी उपचार विकसित करण्याच्या दृष्टीने हे महत्त्वाचे पाऊल ठरू शकते.

यावेळी हणमंतराव गायकवाड यांनी सांगितले की,बीव्हीजी लाइफ सायन्सेस गेल्या दशकभरापासून फायटो-औषध संशोधन क्षेत्रात कार्यरत असून सातत्यपूर्ण प्रयत्नांतून कर्करोगासह इतर अनेक आजारांवर प्रभावी औषधे विकसित करण्यात यश मिळाले आहे.या संशोधनामुळे देशातील कर्करोग रुग्णांना नवी आशा मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बीव्हीजी वेलनेस ओपीडीच्या सल्लागार डॉ. अर्चना शिंदे यांनी केले. संशोधन व विकास उपक्रमांची माहिती विल्यम रणनवरे यांनी दिली,तर डॉ. जयश्री द्रविड यांनी काही महत्त्वपूर्ण केस स्टडीज सादर केल्या.उपस्थित सर्व डॉक्टरांनी यकृत,हृदय,मधुमेह आणि पार्किन्सन यांसारख्या विविध आजारांवरील बीव्हीजीच्या संशोधनाधारित औषधांचे कौतुक केले.तथापि,कार्यक्रमाचा मुख्य भर कर्करोग उपचारावर होता.

# बहुजन समाज पार्टीची प्रभावी विचारधारा जनतेपर्यंत पोहोचवावी-ॲड.सुनिल डोंगर

**मुंबई:बहुजन समाज पार्टीची प्रभावी विचारधारा सर्व जिल्हाध्यक्षांनी सर्वदूर जनतेपर्यंत पोहोचवावी व आपली सत्ता निर्माण करावी असे आवाहन बहुजन समाज पार्टीचे प्रदेशाध्यक्ष ॲड. सुनिल डोंगरे यांनी केले.**

बहुजन समाज पार्टी महाराष्ट्र प्रदेश कमिटीची महत्त्वपूर्ण बैठक दिनांक ८ एप्रिल २०२६ रोजी मुंबईतील बसपा भवन चेंबूर येथे उत्साहात संपन्न झाली. या बैठकीस प्रमुख मार्गदर्शक म्हणून राज्यसभा खासदार तथा महाराष्ट्र केंद्रीय प्रभारी रामजी गौतम हे उपस्थित होते. यावेळी ॲड. सुनील डोंगरे साहेबांनी आपल्या प्रभावी मार्गदर्शनातून कार्यकर्त्यांना प्रेरित केले. या बैठकीत पक्ष संघटना




अधिक बळकट करण्यावर विशेष भर देण्यात आला. राज्यातील प्रत्येक जिल्हा अध्यक्षांनी आपल्या-आपल्या भागात पक्षाची घडी मजबूत करावी, पक्षात नव्या कार्यकर्त्यांची भरती वाढवावी आणि जनतेपर्यंत पक्षाची विचारधारा प्रभावीपणे पोहोचवावी, ज्या माध्यमातून महाराष्ट्रातही आपली सत्ता निर्माण होईल असे स्पष्ट निर्देश ॲड. सुनिल डोंगरे यांनी दिले.बहुजन समाज पार्टी ही सामाजिक न्याय, समानता आणि बहुजनांच्या हक्कांसाठी लढणारी एक महत्त्वाची राजकीय चळवळ आहे. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रातील संघटनात्मक बांधणी अधिक सक्षम करण्यासाठी ही बैठक अत्यंत महत्त्वाची ठरली.बैठकीत आगामी निवडणुका लक्षात घेऊन नियोजन, रणनीती आखणे आणि कार्यकर्त्यांमध्ये समन्वय वाढवणे यावरही सविस्तर चर्चा झाली. पक्षाच्या विचारसरणीचा प्रचार अधिक व्यापक पद्धतीने करण्यासाठी सोशल मीडिया, जनसंपर्क अभियान आणि स्थानिक पातळीवरील उपक्रम राबवण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले.एकंदरीत, या बैठकीतून बहुजन समाज पार्टी महाराष्ट्रात अधिक सक्षम आणि प्रभावीपणे कार्यरत राहण्यासाठी दिशा निश्चित करण्यात आली. यामुळे कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले असून आगामी काळात पक्ष अधिक जोमाने कार्य करेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

